# विद्युत वाहिनीचा झटका लागून चिंचवली येथील महिलेचा मृत्यू

## नुकसान भरपाई देवून संबंधित दोषींवर सदोष मनुष्यवधाची कारवाई करावी - आमदार प्रशांत ठाकूर

पनवेल (प्रतिनिधी) तालुक्यातील चिंचवली तर्फे तळोजे गावातील मनूबाई रामचंद्र ठोंबरे (वय-४७) यांचा गुरूवारी सकाळी ९.४५ सुमारास शेतावार जाताना उच्च दाबाच्या विद्युत वाहिनीच्या लोंबकळत्या तारांशी डोक्यावरील हंडयाचा संपर्क येवून वीजेच्या झटक्याने दुर्देवी मृत्यू झाला.

वीज वितरण कंपनीच्या हलगर्जीपणामुळे हा अपघात झाला असल्याचे येथील गावकऱ्यांनी सांगितले. संपर्क साधूनही दुपारपर्यंत वीज वितरण कंपनीचा एकही अधिकारी व कर्मचारी घटनास्थळी न फिरकल्याने गावकऱ्यांनी तीव्र संताप व्यक्त केला. ही घटना आमदार प्रशांत ठाकूर यांना कळताच त्यांनी ताबडतोब पनवेलच्या ग्रामीण रूग्णलायाच्या शवविच्छेदन गृहाजवळ धाव घेतली व परिस्थिती जाणून घेत वीज वितरणचे कार्यकारी अभियंता दिलीप मेहेत्रे यांना तात्काळ बोलावून घेतले व पिडीत महिलेच्या कुंटूबियांना जास्तीत जास्त नुकसान भरपाई मिळावी आणि संबंधित कर्मचारी व कंत्राटदारांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा, अशी मागणी केली. यावेळी शिरवली विभागीय कॉंग्रेसचे अध्यक्ष शिवाजी दुर्गे, पंचायत समिती विभागीय अध्यक्ष पांडुरंग पाटील, ॲड.संदीप जगे, माजी सरपंच तुकाराम पाटील, उपसरपंच रघुनाथ घोंगे, जोमा आदईकर, गोटिराम मुंढे, राजेश रिकामे, रामचंद्र खाने, प्रदीप खाने, बाळकृष्ण बोलारे यांच्यासह शेकडो ग्रामस्थ उपस्थित होते.

मनूबाई रामचंद्र ठोंबरे व अपर्णा गोटिराम रिकामे या आज सकाळी आपल्या शेताजवळ आल्या असता बांधाजवळूनच जाणाऱ्या लोंबकळत्या उच्च दाबाच्या वीज वाहिनीचा संपर्क मनूबाईच्या डोक्यावर असलेल्या हंडयाला झाला. त्यामुळे मोठा स्फोट होवून वीजेच्या झटक्याने मनूबाई खाली पडल्या. यावेळी आगीचा डोंब कोसळल्याने त्यांच्या डोक्याला व शरीराला भाजून गंभीर दुखापत झाली व जागेवरच त्यांचा मृत्यू झाला. याबाबतीत गावकऱ्यांनी माहिती देताना सांगितले की, पूर्वी ही विद्युत वाहिनी एका खाजगी मालकाच्या जागेतून जात असल्याने ती वळवून दुसरीकडून एक नवीन पोल टाकून घेण्यात आली आहे. यामुळे कोपऱ्यात आलेल्या एकाच पोलवर पुढील वाहिनीचा भार पडून या उच्च दाबाच्या तारा खाली लोंबकळत आहेत. याचा अंदाज न आल्याने मनूबाईचा लोंबकळत्या वीज वाहिनींशी स्पर्श होवून मृत्य झाला. अशा मोठया अपघाताच्या शक्यतेची जाणिव असूनसुध्दा वीज वितरण कंपनीचे अधिकारी व कर्मचारी आणि नविन पोल टाकणाऱ्या कंत्राटदारांने याकडे दुर्लक्ष केले. त्यामुळेच ही दुर्देवी घटना घडली असल्याचे ग्रामस्थांनी म्हंटले. नुकसान भरपाई देवून मनूबाईच्या वारसाला वीज वितरण कंपनीने नोकरीत सामावून घ्यावे, अशी जोरदार मागणीही यावेळी ग्रामस्थांनी केली आहे. या घटनेमुळे आधीच संतापलेल्या गावकऱ्यांनी वीज विरण कंपनीचे अधिकारी व कर्मचाऱ्यांना संपर्क करून सुध्दा न आल्याने अधिक जनक्षोभ उसळला. परंतु आमदार प्रशांत ठाकूर यांनी पनवेल रूग्णालयात जावून गावकऱ्यांना शांत केले व संबंधित दोषींवर गुन्हा दाखल करण्याच्या पोलीसांना सुचना केल्या.